संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कोणतेही दुःसाहस पाकला अंगाशी येईल

**पाकिस्तानच्या** तोंडचं पाणी पळविण्यात भारत यशस्वी झाला असताना आता आपले हातपायही पोळून घेण्यात पाकिस्तानच्या अंगात उत्साह संचारलेला दिसतोय. भारताने जबरदस्त दणका दिल्यानंतरही पाकिस्तानचे टाळके ठिकाणावर येत नसेल तर स्वतःचे नुकसान करून घेण्याची जेवढी काही हौस आहे तेवढी पाकिस्तानने आता या संघर्षात भागवून घ्यावी. भारताची हवाई हद्द ओलांडण्याचा पाकिस्तानने केलेला प्रयत्न भारताने हाणून पाडला किंवा त्याचा खोटारडेपणाही पुन्हा जगासमोर आणला. भारताचे आय् ए एफ् विमान पाडल्याचा दावा पाकिस्तानने केला होता. परंतु तो जुने छायाचित्र दाखवून आपले हसे करून घेण्याचेही उद्योग पाकिस्तानने चालवले आहेत. खरेतर अशा गंभीर परिस्थितीत, म्हणजेच सगळे जग विरुद्ध एकटा पाकिस्तान अशा परिस्थितीत या देशाने कोणतेही दुःसाहस करण्याचा प्रयत्न केला तर तो त्यांच्या अंगाशीच येणार आहे. थोडक्यात भारताने दहशतवाद संपविण्यासाठी उचललेल्या या पावलाचे महत्त्व समजून न घेता दहशतवादाच्या या आगीत तेल ओतण्याचा प्रयत्न पाकिस्तानने जर केला तर ते त्याला आणखीनच नुकसानकारक ठरेल. परंतु दुर्दैव असे आहे की, माथेफिरूपणामुळे पाकिस्तानला नेहमीच नुकसान सहन करावे लागले आहे आणि आता याच चक्रव्यूहामध्ये हा देश सापडला आहे. गेल्या दोन दिवसात ज्या काही घडामोडी घडल्या त्या भारताचा आत्मविश्वास वाढविणाऱ्या आहेत आणि आतादेखील अमेरिकेने पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांना संदेश पाठवून उगाच लष्करी साहस करू नका आणि तणाव वाढवू नका, अशा शब्दात फटकारले आहे. याचा अर्थ एवढेच नव्हे तर चीननेसुद्धा तणाव न वाढविण्याचे आवाहन करून पाकिस्तानने आपल्या मर्यादेत राहावे असा नकळत संदेश दिला आहे. हे समजून घेण्याची कुवत पाकिस्तान लष्कर आणि इतर राज्यकर्त्यांमध्ये नाही. कदाचित याच परिस्थितीचे दहशतवादीसुद्धा फायदा घेत असावेत. या भारत द्वेषाचे आपल्याला परिणाम भोगावे लागतात. त्यातून होणारे नुकसान केवळ लष्करी स्वरूपाचे नाही तर अर्थव्यवस्थेचीही मोठी पडझड होते. आतातर भारताने निर्णायक भूमिका घेतली आहे. कारण भारत स्वतःचे आणखीन नुकसान करून घेऊ आणि पाकिस्तानलाही कोणतीही नवी संधी देऊ इच्छित नाही.

### लडखळलेला पाक

बऱ्याच वर्षांनंतर पाकिस्तान खऱ्या अर्थाने कोंडीत सापडलेला दिसतो. अर्थात ज्यासाठी भारताने दाखवलेली निर्णायक राजकीय इच्छाशक्तीसुद्धा तेवढीच महत्त्वाची ठरते. आतापर्यंतच्या कचखाऊ राजकीय धोरणांमुळे दहशतवाद आटोक्यात येऊ शकला नव्हता. प्रामुख्याने काश्मीरचे पोलीस हातात घेऊन पाकिस्तानचे जे माकडचाळे चालले होते, ते रोखण्याऐवजी त्याचा खेळ करण्याचा प्रकार प्रत्यक्ष काश्मीरमधल्या राजकारण्यांनी केला आणि काश्मीरमधल्या त्या राजकीय डोंबाऱ्यांना डोक्यावर चढविण्याचे काम केंद्रातल्या राज्यकर्त्यांनी केले होते. आता जेव्हा या सगळ्यांच्या नाड्या आवळल्या गेल्यानंतर नेमकी मेख कुठे होती हे वेळीच स्पष्ट झाले. कारण पाकिस्तानच्या पैशावर काश्मीरातले फुटीरतावादी पोसले गेले या आधीच्या सरकारांनी काश्मीरच्या राज्यकर्त्यांना पोसून तिथला दहशतवाद वाढवित नेला. एकीकडे भारताने बालाकोट इथे हल्ला चढविला असताना त्याच दिवशी काश्मीरातल्या काही फुटीरतावाद्यांना राष्ट्रीय सुरक्षा एजन्सीने ताब्यात घेतले आणि त्यांच्या घरांवर छापे घालून त्यांच्या पाकिस्तानी संबंधांचा पुन्हा बंदोबस्त केला. या सगळ्या कारवाईने थबकलेल्या याच राज्याच्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनी भारताने केलेल्या हल्ल्याबद्दल उपरोधिक टीका सुरू केली. सोशल मीडियावर एवढा आनंद होण्याचे कारण काय असा पाकधार्जिणा सवाल करायलाही त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. यावरून दहशतवादाचे मूळ ज्या पाकमध्ये होते तोच बंदोबस्त करीत असताना काश्मीरमधील पाळेमुळेही त्याच ताकदीने उखडून काढण्याचे काम सुरू केले. म्हणूनच आज भारत एवढा जोखीमीचा लढा एका निर्णायक टप्प्यावर आणू शकला. त्यामधून पाकिस्तानला योग्य तो धडा मिळायला हवा किंवा पाकिस्तानने तो समजून घ्यायला हवा.